ग्रं. स. ठाणें
काव्य
८८५५
१८८४

श्री

# ...कृत मनाचे श्लोक.

...जन...ठी ॥



नं 309
म. ग्रं. सं. ठाणें
309
विषय
काव्य
संग्रहालय क्रमांक
८८५५
लेखक
दास
सन
१८८३
पुस्तकाचें नांव रामदासकृत
मनाचे श्लोक

श्री

# अथरामदासकृतमनाचेश्लोकप्रा०

—मुळ—

गणाधीशजोईशसर्वांगुणांचा ॥ मुळारंभआरं
भतोनिर्गुणाचा ॥ नमोशारदामूळचत्वारिवाचा ॥
गमोपंथआनंतयाराघवाचा ॥ १ ॥

मनासज्जनाभक्तिपंथेंचिजावें ॥ तरीश्रीहरीपा
विजेतोस्वभावें ॥ जनींनिंद्यतेंसर्वसोडोनिद्यावें ॥
जनींवंद्यतेंसर्वभावेंकरावें ॥ २ ॥

प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥ पुढेंवैखरीराम
आधींवदावा ॥ सदाचारहाथोरसांडूनयेतो ॥ जगीं
तोचितोमानवीधन्यहोतो ॥ ३ ॥

मनावासनादुष्टकामानयेरे ॥ मनासर्वथापापबु
द्धीनकोरे ॥ मनासर्वथानीतिसोडूंनकोहो ॥ मना
अंतरींसारवीचारराहो ॥ ४ ॥

२१०५४



मनापापसंकल्पसोडोनिद्यावा ॥ मनासत्यसंकल्पजीवींधरावा ॥ मनाकल्पनातेनकोवीषयाची॥ विकारेंघडेहोजनींसर्वछीछी ॥ ५ ॥

नकोरेमनाक्रोधहाखेदकारी ॥ नकोरेमनाकाम नानाविकारी॥नकोरेमनासर्वदाअंगिकारू॥नकोरेमनामत्सरूदंभभारू ॥ ६ ॥

मनाश्रेष्ठधारिष्टजीवींधरावें ॥ मनाबोलणेंनीचसोशीतजावें ॥ स्वयेंसर्वदानम्रवाचेवदावें ॥ मनासर्वलोकांसिरेनीववावें ॥ ७ ॥

देहत्यागितांकीर्तिमागेंउरावी ॥ मनासज्जनाहेचिक्रीयाधरावी ॥ मनाचंदनाचेपरीत्वांझिजावें॥ परीअंतरींसज्जनानीववावें ॥ ८ ॥

नकोरेमनाद्रव्यतेंपूढिलांचें॥अतीस्वार्थबुद्धीनुरेपापसाचें ॥ घडेभोगणेंपापतेंकर्मखोटें ॥ नहोतांमनासारिखेंदुःखमोठें ॥ ९ ॥

श्री

# अथरामदासकृतमनाचेश्लोकप्रा०

— मुला ————————

गणाधीशजोईशसर्वांगुणांचा ॥ मुळारंभआरं भतोनिर्गुणाचा ॥ नमोशारदामूळचत्वारिवाचा ॥ गमोपंथआनंतयाराघवाचा ॥ १ ॥

मनासज्जनाभक्तिपंथेंचिजावें ॥ तरीश्रीहरीपा विजेतोस्वभावें ॥ जनींनिंद्यतेंसर्वसोडोनिद्यावें ॥ जनींवंद्यतेंसर्वभावेंकरावें ॥ २ ॥

प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥ पुढेंवैखरीराम आधींवदावा ॥ सदाचारहाथोरसांडूनयेतो ॥ जगीं तोचितोमानवीधन्यहोतो ॥ ३ ॥

मनावासनादुष्टकामानयेरे ॥ मनासर्वथापापबु द्धीनकोरे ॥ मनासर्वथानीतिसोडूंनकोहो ॥ मना अंतरींसारवीचारराहो ॥ ४ ॥

अ. ३१०५
२।१२



मनापापसंकल्पसोडोनिद्यावा ॥ मनासत्यसंकल्पजीवींधरावा ॥ मनाकल्पनातेनकोवीषयाची॥ विकारेंघडेहोजनींसर्वछीछी ॥ ५ ॥

नकोरेमनाक्रोधहाखेदकारी ॥ नकोरेमनाकामनानाविकारी॥नकोरेमनासर्वदाअंगिकारू॥नकोरेमनामत्सरूदंभभारू ॥ ६ ॥

मनाश्रेष्ठधारिष्टजीवींधरावें ॥ मनाबोलणेंनीचसोशीतजावें ॥ स्वयेंसर्वदानम्रवाचेवदावें ॥ मनासर्वलोकांसिरेनीववावें ॥ ७ ॥

देहत्यागितांकीर्तिमागेंउरावी ॥ मनासज्जनाहेचिक्रीयाधरावी ॥ मनाचंदनाचेपरीत्वांझिजावें॥ परीअंतरींसज्जनानीववावें ॥ ८ ॥

नकोरेमनाद्रव्यतेंपूढिलांचें॥अतीस्वार्थबुद्धीनुरेपापसाचें ॥ घडेभोगणेंपापतेंकर्मखोटें ॥ नहोतांमनासारिखेंदुःखमोठें ॥ ९ ॥

सदासर्वदाप्रीतिरामीं धरावी ॥ दुखाचीस्वयेंसां डजीवींकरावी ॥ देहदुःखतेंसूखमानीतजावें ॥ विवेकेंसदास्वस्वरूपींभजावें ॥ १० ॥

जगींसर्वसूखीअसाकोणआहे ॥ विचारीमना तूंचिशोधूनपाहें ॥ मनात्वांचिरेपूर्वसंचीतकेलें ॥ तयासारिखेंभोगणेंप्राप्तझालें ॥ ११ ॥

मनामानसींदुःखआणूंनकोरे ॥ मनासर्वथाशोकचिंतानकोरे ॥ विवेकेंदेहबुद्धीसोडोनिद्यावी ॥ विदेहीपणेंमुक्तिभोगीतजावी ॥ १२ ॥

मनासांगपांरावणाकायझालें ॥ अकस्माततेंराज्यसर्वबुडालें ॥ ह्मणोनीकुडीवासनासांडिवेगीं ॥ बळेंलागलाकाळहापाठिलागीं ॥ १३ ॥

जिवाकर्मयोगेंजनींजन्मझाला ॥ परीशेवटींकाळघेऊनिगेला ॥ महाथोरतेमृत्युपंथेंचिगेले ॥ असंख्याततेजन्मलेआणिमेले ॥ १४ ॥

काव्य ३०२

मनापाहतांसत्यहेंमृत्युभूमी ॥ जितांबोलतीसर्व
हीजीवमीमी ॥ चिरंजीवहेसर्वहीमानिताती ॥ अ
कस्मातसांडूनियांसर्वजाती ॥ १५ ॥

मरेएकत्याचादुजाशोकवाहे ॥ अकस्माततोही
पुढेंजातआहे ॥ पुरेनाजनींलोभरेक्षोभहोतो ॥ ह्म
णोनीजनींमागुतांजन्मघेतो ॥ १६ ॥

मनामानसींव्यर्थचिंतावहाते ॥ अकस्मातहो
णारहोऊनिजातें ॥ घडेभोगनासर्वहीकर्मयोगें ॥
मतीमंदतोखेदमानीवियोगें ॥ १७ ॥

मनाराघवावीणआशानकोरे ॥ मनामानवाची
नकोकीर्तितूंरे ॥ जयावर्णितीवेदशास्त्रेंपुराणें ॥ त
यावर्णितांसर्वहीश्लाघ्यवाणें ॥ १८ ॥

मनासर्वथासत्यसांडूंनकोरे ॥ मनासर्वथामि
थ्यभांडूंनकोरे ॥ मनासत्यतेंसत्यवाचेवदावें ॥ म
नामिथ्यतेंमिथ्यसोडोनिद्यावें ॥ १९ ॥

बहूहिंपुटीहोइजेमायपोटीं ॥ नकोरेमनायात नातेचिमोठी ॥ निरोधेंपचेकोंडिलेंगर्भवासीं ॥ अधोमूखरेदुःखत्याबाळकासी ॥ २० ॥

मनावासनाचूकवींयेरझारा ॥ मनाकामनासोडवींद्रव्यदारा ॥ मनायातनाथोरहेगर्भवासी ॥ मनासज्जनाभेटवींराघवासीं ॥ २१ ॥

मनासज्जनाहीतमाझेंकरावें ॥ रघूनायकाद्दढचित्तींधरावें ॥ महाराजतोस्वामिवायूसुताचा ॥ जनाउद्धरीनाथलोकत्रयाचा ॥ २२ ॥

नबोलेमनाराघवावीणकांहीं ॥ जनींवाउगेंबोलतांसौख्यनाहीं ॥ घडीनेघडीकाळआयुष्यनेतो ॥ देहांतींतुलाकोणसोडूंपहातो ॥ २३ ॥

रघूनायकावीणवायांशिणावें ॥ जनासारिखेंव्यर्थकांवोसणावें ॥ सदासर्वदानामवाचेवसोंदे ॥ अहंतामनींपापिणीतेनसोंदे ॥ २४ ॥

मनावीटमानूंनकोबोलण्याचा ॥ पुढामागुतारा
मजोडेलकैंचा ॥ सुखाचीघडीलोटतांसूखआहे ॥ पु
ढेंसर्वजाईलकांहींनराहे ॥ २५ ॥

देहरक्षणाकारणेंयत्नकेला॥परीशेवटींकाळघेऊनि
गेला ॥ करींरेमनाभक्तियाराघवाची ॥ पुढेंअंतरीं
सोडचिंताभवाची ॥ २६ ॥

भवाचेभयेंकायभीतोसिलंडी ॥ धरींरेमनाधैर्य
धाकासिसांडीं ॥ रघूनायकासारिखास्वामिशीरीं ॥
नुपेक्षीकदाकोपल्यादंडधारी ॥ २७ ॥

दिनानाथहारामकोदंडधारी ॥ पुढेंदेखतांकाळ
पोटींथरारी ॥ जनींवाक्यनेमस्तहेंसत्यमानी ॥ नुपे
क्षीकदारामदासाभिमानी ॥ २८ ॥

परीराघवाचेंसदाब्रीदगाजे ॥ बळेंभक्तरीपूशिरीं
काविराजे ॥ पुरीवाहिलीसर्वजेणेंविमानीं ॥ नुपेक्षी
कदारामदासाभिमानी ॥ २९ ॥

समर्थाचियासेवकावक्रपाहे ॥ असासर्वभूमंडळींकोणआहे ॥ जयाचीलिलावर्णितीलोकतीन्ही ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ ३० ॥

महासंकटींसोडिलेदेवजेणें ॥ प्रतापेंबळेंआगळाकोटिगूणें ॥ जयातेंस्मरेशैलजाशूलपाणी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ ३१ ॥

अहिल्याशिलाराघवेंमुक्तकेली ॥ पदींलागतांदिव्यहोऊनिगेली ॥ जयावर्णितांशीणलीवेदवाणी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ ३२ ॥

वसेमेरुमांदारहेसृष्टिलीला ॥ शशीसूर्यतारांगणींमेघमाला ॥ चिरंजीवकेलेजगींदासदोन्ही ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ ३३ ॥

सदासर्वदादेवसन्नीधआहे ॥ कृपाळूपणें अल्पधारिष्टपाहे ॥ सुखानंदआनंदकैवल्यदानी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ ३४ ॥

उपेक्षाकधींरामरूपींअसेना ॥ जिवामानवानि श्चयोतोवसेना ॥ शिरींभारवाहेनबोलेपुराणीं ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ ३५ ॥

असेहोजयाअंतरींभावजैसा ॥ वसेहोतयाअंत रींदेवतैसा ॥ अनन्यासिरक्षीतसेचापपाणी ॥ नुपे क्षीकदारामदासाभिमानी ॥ ३६ ॥

सदाचक्रवाकासिमार्तंडजैसा ॥ उडीघालितोसं कटींस्वामितैसा ॥ हरीभक्तिचाघावघालीनिशाणी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ ३७ ॥

मनाप्रार्थनातूजलाएकआहे ॥ रघूराजअंकी तहोऊनिराहें ॥ अवज्ञाकधींहोयदर्थीनकीजे॥मना सज्जनाराघवींवस्तिकीजे ॥ ३८ ॥

जयावर्णितीवेदशास्त्रेंपुराणें ॥ तयाचेनियोगें समाधानहोणें ॥ तयालागिंहेंसर्वचांचल्यदीजे ॥ म नासज्जनाराघवींवस्तिकीजे ॥ ३९ ॥

मनापाविजेसर्वहीसूखजेथें ॥ अती आदरेंठेविजे लक्ष्यतेथें ॥ विवेकेंकुडीकल्पनापालटीजे ॥ मनासज्जनाराघवींवस्तिकीजे ॥ ४० ॥

बहूहिंडतांसूखहोणारनाहीं ॥ शिणावेंपरीनातुडेहीतकांहीं ॥ विचारेंबराअंतरींबोधकीजे ॥ मनासज्जनाराघवींवस्तिकीजे ॥ ४१ ॥

बहूतांपरीहेंचिआतांधरावें ॥ रघूनायकाआपलेंसेंकरावें ॥ दिनानाथहातोडरींब्रीदगाजे ॥ मनासज्जनाराघवींवस्तिकीजे ॥ ४२ ॥

मनासज्जनाएकजीवींधरावें ॥ जनींआपुलेंहीतत्त्वांकरावें ॥ रघूनायकावीणबोलोंनकोहो ॥ सदामानसींहानिजध्यासराहो ॥ ४३ ॥

मनारेमनींमौनमुद्राधरावी ॥ कथाआदरेंराघवाचीकरावी ॥ नसेरामतेंधामसोडोनिद्यावें ॥ सुखालागिंआरण्यसेवीतजावें ॥ ४४ ॥

ग्रंथ 292

जयाचेनिसंगेंसमाधानभंगे ॥ अहंताअकस्मात येऊनिलागे ॥ तयासंगतीचीजनींकोणगोडी ॥ जियेसंगतीनेंमतीरामसोडी ॥ ४५ ॥

मनाजेघडीराघवावीणगेली ॥ जगींतेंतुवांआपली हानिकेली ॥ रघूनायकावीणतोशीणआहे ॥ जनींदक्षतोलक्षलावूनिपाहे ॥ ४६ ॥

मनालोचनींश्रीहरीतोचिपाहें ॥ जगींजाणता भक्तहोऊनिराहें ॥ गुणींप्रीतिलागोक्रमूसाधनाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ ४७ ॥

सदादेवकाजींझिजेदेहज्याचा ॥ सदारामनामें वदेनित्यवाचा ॥ स्वधर्मेंचिचालेसदाउत्तमाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ ४८ ॥

सदाबोलण्यासारिखेंचालताहे ॥ अनेकींसदा एकदेवासिपाहे ॥ सगूणींभजेलेशनाहींभ्रमाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ ४९ ॥

नसेअंतरींकामनानाविकारी ॥ उदासीनतो तापसीब्रह्मचारी ॥ निवालामनींलेशनाहींतमाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ ५० ॥

मदेंमत्सरेंसांडिलीस्वार्थबुद्धी ॥ प्रपंचीकनाहीं जयातेंउपाधी ॥ सदाबोलणेंनम्रवाचासुवाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ ५१ ॥

क्रमीवेळतोतत्त्वचिंतानुवादें ॥ नलिंपेकदादंभवादेंविवादें ॥ करीसूखसंवादतोऊगमाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ ५२ ॥

सदाआर्जवीप्रीयजोसर्वलोकीं ॥ सदासर्वदासत्यवादीविवेकी॥नबोलेकदामिथ्यवाचात्रिवाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ ५३ ॥

सदासेविआरण्यतारुण्यकाळीं ॥ मिळेनाकदाकल्पनेचेनिमेळीं ॥ चळेनामनींनिश्चयोदृढज्याचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ ५४ ॥

नसेमानसींदुष्टआशादुराशा ॥ वसेअंतरींप्रेम पाशापिपाशा ॥ ऋणीदेवह्माभक्तिभावेंजयाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ ५५ ॥

दिनाचादयाळूमनाचामवाळू ॥ स्नेहाळूकृपाळूजगींदासपाळू ॥ जयाअंतरींक्रोधसंतापकैंचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ ५६ ॥

जगींहोइजेधन्ययारामनामें ॥ क्रियाभक्तिउपासनानित्यनेमें ॥ उदासीनतातत्त्वतासारआहे ॥ सदासर्वदामोकळीवृत्तिराहे ॥ ५७ ॥

नकोवीषयींवासनावृत्तिरूपें ॥ यदर्थीजडेकामनापूर्णपापें ॥ सदारामनिष्कामचित्तींवसावा ॥ मनींकल्पनालेशतोहीनसावा ॥ ५८ ॥

मनाकल्पनाकल्पितांकल्पकोटी ॥ नव्हेरेनव्हेसर्वथारामभेटी ॥ मनींकामनारामनाहींजयाला ॥ अतीआदरेंप्रेमनाहींतयाला ॥ ५९ ॥

मनारामकल्पतरूकामधेनू ॥ निधीसारचिंता
मणीकायवानू ॥ जयाचेनियोगेंघडेसर्वसत्ता ॥ त
यासाम्यताकायशीकोणआतां ॥ ६० ॥

उभाकल्पवृक्षातळींदुःखवाहे ॥ तयाअंतरींसर्व
दातेंचिराहे ॥ जनींसज्जनींवादहावाढवावा ॥ पुढें
मागुतीशोकजीवींधरावा ॥ ६१ ॥

निजध्यासतोसर्वतूटोनिगेला ॥ बळेंअंतरींशो
कसंतापठेला ॥ सुखानंदस्वानंदभेदेंबुडाला ॥ म
नानिश्चयोसर्वखेदेंउडाला ॥ ६२ ॥

घरींकामधेनूपुढेंताकमागे ॥ हरीबोधसोडोनिवी
वादिंलागे ॥ करीसारचिंतामणीकाचखंडें ॥ तया
मागतांदेतसेतोउदंडें ॥ ६३ ॥

अतीमूढत्याहृढबुद्धीअसेना ॥ अतीकामत्यारा
मचित्तींवसेना ॥ अतीलोभत्याक्षोभहोईलजाणा ॥
अतीवीषयीसर्वदादैन्यवाणा ॥ ६४ ॥

नकोदैन्यवाणेंजिणेंभक्तिवीणें ॥ अतीमूर्खत्या सर्वदादुःखदूणे ॥ धरीं रेमनाआदरेंप्रीतिरामीं ॥ नकोवासनाहेमधामींविरामीं ॥ ६५ ॥

नव्हेसारसंसारहाघोरआहे ॥ मनासज्जनासर्व शोधोनिपाहें ॥ जनींवीषखातांपुढेंसौख्यकैचें ॥ ध रींरेमनाध्यानयाराघवाचें ॥ ६६ ॥

घनःश्यामहारामलावण्यरूपी ॥ महाधीरगंभी रपूर्णप्रतापी ॥ करीशेवटींसेवकाचाकुडावा ॥ प्रभा तेमनींरामचिंतीतजावा ॥ ६७ ॥

बळेंआगळारामकोदंडधारी ॥ महाकाळविक्रा ळपोटींथरारी ॥ पुढेंमानवाकिंकराकोणकेवा ॥ प्र भातेमनींरामचिंतीतजावा ॥६८॥

सुखानंदकारीनिवारीभयातें ॥ जनींभक्तिभावें भजावेंतयातें ॥ विवेकेंत्यजावाअनाचारहेवा ॥ प्र भातेमनींरामचिंतीतजावा ॥६९॥

सदारामनामेंवदापूर्णकामें ॥ कदाबाधिजेनाप
दानित्यनेमें ॥ मदालस्यहासर्वसोडोनिद्यावा ॥
प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥ ७० ॥

जयाचेनिनामेंमहादोषजाती ॥ तयाचेनिनामें
गतीपाविजेती॥जयाचेनिनामेंघडेपुण्यठेवा ॥ प्रभा
तेमनींरामचिंतीतजावा ॥ ७१ ॥

नवेचेकदाग्रंथिचाअर्थकांहीं ॥ सुखेंनामउच्चा
रितांकष्टनाहीं ॥ महाघोरसंसारशत्रूजिणावा ॥ प्र
भातेमनींरामचिंतीतजावा ॥ ७२ ॥

देहदंडणाचेंमहादुःखआहे ॥ महादुःखतेंनाम
घेतांनराहे ॥ सदाशीवचिंतीतसेदेवदेवा ॥ प्रभाते
मनींरामचिंतीतजावा ॥ ७३ ॥

बहूतांपरीसंकटेंसाधनाचीं ॥ व्रतेंदानउद्यापनें
तींधनाचीं ॥ दिनाचादयाळूमनींआठवावा ॥ प्र
भातेमनींरामचिंतीतजावा ॥ ७४ ॥

समस्तामध्येंसारसाचारआहे ॥ कळेनातरीस
र्वशोधूनिपाहें ॥ मनासंशयोवाउगातोत्यजावा ॥
प्रभातेमनींराम चिंतीतजावा ॥ ७५ ॥

नव्हेकर्मनाधर्मनायोगकांहीं ॥ नव्हेभोगनात्या
गनासांगकांहीं ॥ ह्मणेदासविश्वासनामींधरावा ॥
प्रभातेमनींराम चिंतीतजावा ॥ ७६ ॥

करीकामनिष्कामयाराघवाचें ॥ करीरूपस्वरू
पसर्वांजिवांचें ॥ करीछंदनिर्द्वंद्वहेगूणगातां ॥ धरी
कीर्तनींवृत्तिविश्वासहोतां ॥ ७७ ॥

अहोज्यानराराम विश्वासनाहीं ॥ तयापामरा
बाधिजेसर्वकांहीं ॥ महाराजतोस्वामिकैवल्यदाता ॥
वृथावाहणेंदेहसंसारचिंता ॥ ७८ ॥

मनापावनाभावनाराघवाची ॥ धरींअंतरींसो
डिंचिंताभवाची ॥ भवाचेभयेंमानवाभूलठेली ॥ न
सेवस्तुचीधारणाव्यर्थगेली ॥ ७९ ॥

मनामत्सरेंनामसोडूंनकोहो ॥ अतीआदरेंहा निजध्यासराहो ॥ समस्तांमतेंनामतेंसारआहे ॥ दुजीतूलनातूलिताहेनसाहे ॥ ८० ॥

धराश्रीवरात्याहराअंतरातें ॥ तरादुस्तरात्यापरा सागरातें ॥ सरावीसरात्याभरादुर्भरातें ॥ करानी कुरात्याखरामत्सरातें ॥ ८१ ॥

बहूनामयारामनामींतुळेना ॥ अभाग्यानरापा मराहेंकळेना ॥ विषाऔषधघेतलेंपार्वतीशें ॥ जिवामानवाकिंकराकोणपूसे ॥ ८२ ॥

जेणेंजाळिलाकामतोरामध्यातो ॥ उमेसीअती आदरेंगूणगातो ॥ बहूज्ञानवैराग्यसामर्थ्यजेथें ॥ परीअंतरींरामविश्वासतेथें ॥ ८३ ॥

विठोनेंशिरींवाहिलादेवराणा ॥ तयाअंतरींध्या सरेत्यासनेणा ॥ निवालास्वयेंतापसीचंद्रमौळी ॥ जिवासोडवीरामहाअंतकाळीं ॥ ८४ ॥

भजारामविश्रामयोगेश्वराचा ॥ जपानेमिला नेमगौरीहराचा ॥ निवालास्वयेंतापसीचंद्रमौळी ॥ जिवासोडवीरामहाअंतकाळीं ॥ ८५ ॥

मुखींरामविश्रामतेथेंचिआहे ॥ सदानंदआनंदशोधोनिपाहें ॥ तयावीणतोशीणसंदेहकारी ॥ निजध्यासतोशोकसंतापहारी ॥ ८६ ॥

मुखींरामत्याकामबाधूंशकेना ॥ गुणीइष्टधारिष्टत्याचेंचुकेना ॥ हरीभक्ततोशत्रुकामासिमारी ॥ जगींधन्यतोमारुतीब्रह्मचारी ॥ ८७ ॥

बहूचांगलेंनामयाराघवाचें ॥ अतीसाजिरेंस्वल्पसोपेंफुकाचें ॥ करीमूळनिर्मूळघेतांभवाचें ॥ जिवामानवाहेंचिकैवल्यसाचें ॥ ८८ ॥

जनींभोजनींनामवाचेंवदावें ॥ अतीआदरेंनामघोषेंह्मणावें ॥ हरीचिंतनीं अन्नसेवीतजावें ॥ तरी श्रीहरीपाविजेतोस्वभावें ॥ ८९ ॥

नयेरामवाणीतयाथोरहानी ॥ जनींव्यर्थप्राणी
तयानामकर्णीं ॥ हरीनामहेंवेदशास्त्रींपुराणीं ॥ ब
हूआगळीबोलिलीवेदवाणी ॥ १० ॥

नकोवीटमानूंरघूनायकाचा ॥ अतीआदरेंबो
लिजेवेदवाचा ॥ नवेचेमुखींसांपडेरेफुकाचा ॥ क
राघोषत्याजानकीवल्लभाचा ॥ ११ ॥

अतीआदरेंसर्वहीनामघोषें ॥ गिरीकंदरींजाइ
जेदूरदेशें ॥ हरीतुष्टलातोषलानामघोषें ॥ विशेषेंह
रीमानसींरामपीसें ॥ १२ ॥

जगींपाहतांरामहाअन्नदाता ॥ तयालागिंहो
तत्त्वतासारचिंता ॥ तयाचेंमुखींनामघेतांफुकाचें ॥
मनासांगपांरेतुझेंकायवेंचे ॥ १३ ॥

तिन्हीलोकजाळूंशकेकोपयेतां ॥ निवालाहरू
तोमुखींनामघेतां ॥ जपेआदरेंपार्वतीविश्वमाता ॥
ह्मणोनीह्मणातेंचिहेंनामआंता ॥ १४ ॥

अजामीळपापीवदेपुत्रकामें ॥ तयामुक्तिनारा यणाचेनिनामें ॥ शुकाकारणेंकुंटिणीरामवाणी ॥ मुखींबोलतांख्यातिझालीपुराणीं ॥ ९५

महाभक्तप्रऱ्हादहादैत्यकूळीं ॥ जपेरामनामाव ळीनित्यकाळीं ॥ पितापापरूपीतयादेखवेना ॥ ज नींदैत्यतोनाममूखींह्मणेना ॥ ९६ ॥

मुखींनामनाहींतयामुक्तिकैंची ॥ अहंतागुणें यातनातेफुकाची ॥ पुढेंअंतयेईलतोदैन्यवाणा ॥ ह्मणोनीह्मणारेह्मणादेवराणा ॥ ९७ ॥

हरीनामनेमस्तपाषाणतारी ॥ बहूतारिलेमान वदेहधारी ॥ तयारामनामींसदाजोविकल्पी ॥ वदेनाकदाजीवतोपापरूपी ॥ ९८ ॥

जगींधन्यवाराणसीपुण्यराशी ॥ तयामाजिजा तांगतीपूर्वजांसी ॥ मुखींरामनामावळीनित्यकाळीं ॥ जिवाहीतसांगेसदाचंद्रमौळी ॥ ९९ ॥

यथासांगरेकर्मतेंहीघडेना ॥ घडेकर्मतेंपुण्यगांठीं पडेना ॥ दयापाहतांसर्वभूतींअसेना ॥ फुकाचेंमुखींनामतेंहीवसेना ॥ १०० ॥

जयानावडेनामत्यायमजाची ॥ विकल्पेंउठेतर्कत्यासर्वछीछो ॥ ह्मणोनीअतीआदरेंनामघ्यावें ॥ मुखींबोलतांदोषजातीस्वभावें ॥ १०१ ॥

अतीलीनतासर्वभावेंस्वभावें ॥ जनासज्जनालागिंसंतोषवावें ॥ देहेकारणींसर्वलावीतजावें ॥ सगूणेंअतीआदरेंसीभजावें ॥ १०२ ॥

हरीकीर्तनींप्रीतिभावेंधरावी ॥ देहेबुद्धिनीरूपणींवीसरावी ॥ परद्रव्यआणीकक्कांतापरावी ॥ यदर्थींस्वयेंसांडजीवींकरावी ॥ १०३ ॥

क्रियेवीणनानापरीबोलिजेतें ॥ परीचित्तदुश्चित्ततेंलाजवीतें ॥ मनाकल्पनाधीटसैराटधांवे ॥ तयामानवादेवकैसेनिपावे ॥ १०४ ॥

विवेकेंक्रियाआपुलीपालटावी ॥ अतीआदरें शुद्धक्रीयाधरावी ॥ जगींबोलण्यासारिखेंचालबा पा ॥ मनींकल्पनासोडसंसारतापा ॥ १०५ ॥

बरीस्नानसंध्याकरींएकनिष्ठा ॥ विवेकेंमनाआवरींस्थानभ्रष्टा ॥ दयासर्वभूतींजयामानवाला ॥ सदाप्रेमळूभक्तिभावेंनिमाला ॥ १०६ ॥

मनाकोपआरोपणातेनसावी ॥ मनाबुद्धिरेसाधुसंगेंवसावी ॥ मनानष्टचांडाळतोसंगत्यागीं ॥ मनाहोयरेमोक्षभोगीविभागी ॥ १०७ ॥

सदासर्वदासज्जनाचेनियोगें ॥ क्रियापालटेभक्तिभावार्थलागे ॥ क्रियेवीणवाचाळतातेनिवारी ॥ तुटेवादसंवादतोहीतकारी ॥ १०८ ॥

जनींवादसंवादसोडोनिद्यावा ॥ जनींसूखसंवादसूखेंकरावा ॥ जनींतोचितोसूखसंतापहारी ॥ तुटेवादसंवादतोहीतकारी ॥ १०९ ॥

तुटेवादसंवादत्यातेंह्मणावें ॥ विवेकेंअहंभाव त्यातेंजिणावें ॥ अहंतागुणेंवादनानाविकारी ॥ तुटेवादसंवादतोहीतकारी ॥ ११० ॥

हिताकारणेंबोलणेंसत्यआहे ॥ हिताकारणेंसर्व शोधोनिपाहें ॥ हिताकारणेंबंडपाखांडवारी ॥ तुटे वादसंवादतोहीतकारी ॥ १११ ॥

जनींसांगतांऐकतांजन्मगेला ॥ परीवादवीवादतैसाचिठेला ॥ उठेसंशयोवादहादंभभारी ॥ तुटे वादसंवादतोहीतकारी ॥ ११२ ॥

जनींहीतपंडीतसांगोनिगेले ॥ अहंतागुणेंब्रह्मराक्षसझाले ॥ तयाहूनिव्युत्पन्नतोकोणआहे ॥ मनासर्वजाणीवसोडोनिराहें ॥ ११३ ॥

तुटेवादसंवादतेथेंकरावा ॥ विवेकेंअहंभावहापालटावा ॥ जनींबोलण्यासारिखेंआचरावें ॥ क्रियापालटेभक्तिपंथेंचिजावें ॥ ११४ ॥

फुकाचेंमुखींबोलतांकायवेंचे ॥ दिसंदीसअभ्यंतरींगर्वसाचे ॥ क्रियेवीणवाचाळताव्यर्थआहे ॥ विचारीमनातूंचिशोधूनिपाहें ॥ ११५ ॥

बहूशापितांकष्टलाअंबऋषी ॥ तयाचेस्वयेंश्रीहरीजन्मसोशी ॥ दिलाक्षीरसिंधूतयाउपमानी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ ११६ ॥

ध्रुवलेंकरूंबापुडेंदैन्यवाणें ॥ कृपाभाकितांदीधलीभेटजेणें ॥ चिरंजीवतारांगणींप्रेमखाणी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ ११७ ॥

गजेंद्रमहासंकटींवाटपाहे ॥ तयाकारणेंश्रीहरीधांवताहे ॥ उडीघातलीजाहलाजीवदानी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ ११८ ॥

अजामीळपापीतयाअंतझाला ॥ कृपाळूपणेंतोजनींमुक्तकेला ॥ अनाथासिआधारहाचक्रपाणी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ ११९ ॥

विधीकारणेंजाह्लामत्स्यवेगीं ॥ धरोकूर्मरूपी धरापृष्ठभागीं ॥ जनांरक्षणाकारणेंनीचयोनी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ १२० ॥

महाभक्तप्रऱ्हादहाकष्टवीला ॥ ह्मणोनीतया कारणेंसिंहझाला ॥ नयेज्वाळवीशाळसन्नीधकोणी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ १२१ ॥

कृपाभाकितांजाह्लावज्रपाणी ॥ तयाकारणेंवामनचक्रपाणी ॥ द्विजाकारणेंभार्गवचापपाणी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ १२२ ॥

अहल्यासतीलागिंआरण्यपंथें ॥ कुडावापुढेंदेव वंदीतयातें ॥ बळेंसोडितांघावघालीनिशाणी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ १२३ ॥

तयाद्रौपदीकारणेंलागिवेगें ॥ त्वरेंधांवतोसर्व सांडोनिमागें ॥ कलीलागिंझालाअसेबौद्धमौनी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ १२४ ॥

अनाथादिनाकारणेंजन्मताहे ॥ कलंकीपुढेंदे
वहोणारआहे ॥ तयावर्णितांशीणलीवेदवाणी ॥
ह्मुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ १२५ ॥

जनाकारणेंदेवलीलावतारी ॥ बहूतांपरीआदरें
वेषधारी ॥ तयानेणतीतेजनींपापरूपी ॥ दुरात्मे
महानष्टचांडाळपापी ॥ २६ ॥

जगींधन्यतोराममूखींनिवाला ॥ कथाऐकतां
सर्वतल्लीनझाला ॥ देहभावनारामबोधेंउडाली ॥
मनोवासनारामरूपींविराली ॥ २७ ॥

गतीकारणेंसंगतीसज्जनाची ॥ मतीपालटेसूम
तीदुर्जनाची ॥ रतीनायकाचापतीभ्रष्टआहे ॥ ह्म
णोनीमनातीतहोऊनिराहें ॥ २८ ॥

मनाअल्पसंकल्पतोहीनसावा ॥ मनासत्यसं
कल्पचित्तींधरावा ॥ जनींजल्पवीकल्पतोहीत्यजा
वा ॥ रमाकांतएकांतकाळींभजावा ॥ २९ ॥

मनावासनावासुदेवींवसोंदे ॥ मनाकामनाकामसंगींनसोंदे ॥ मनाकल्पनावाउगीतेनकीजे ॥ मनासज्जनासज्जनींवस्तिकीजे ॥ १३० ॥

भजायाजनींपाहतांरामएक ॥ करींबाणएकमुखींशब्दएक ॥ क्रियापाहतांउद्धरीसर्वलोक ॥ धराजानकीनायकाचाविवेक ॥ ३१ ॥

विचारूनिबोलेविवंचूनिचाले ॥ तयाचेनिसंतप्ततेहीनिवाले ॥ बरेंशोधिल्यावीणबोलूंनको हो ॥ जनींबोलणेंशुद्धनेमस्तराहो ॥ ३२ ॥

हरीभक्तवीरक्तविज्ञानराशी ॥ जेणेंमानसींस्थापिलेंनिश्चयासीं ॥ तयादर्शनेंस्पर्शनेंपुण्यजोडे ॥ तयाभाषणेंनष्टसंदेहमोडे ॥ ३३ ॥

नसेगर्वआंगींसदावीतरागी॥क्षमाशांतिभोगीदयादक्षयोगी ॥ नसेलोभनाक्षोभनादैन्यवाणा ॥ अशालक्षणींजाणिजेयोगराणा ॥ ३४ ॥

धरींरेमनासंगतीसज्जनाची ॥ जेणेंवृत्तिहेपालटेदुर्जनाची ॥ बळेंभावहावृत्तिसन्मार्गलागे ॥ महाक्रूरतोकाळविक्राळभंगे ॥ १३५ ॥

भयेंव्यापिलेंसर्वब्रह्मांडआहे ॥ भयातीततेसंतआनंतपाहें ॥ जयापाहतांद्वैतकांहींदिसेना ॥ तयामानसींसर्वथाहीवसेना ॥ ३६ ॥

जिवाश्रेष्ठतेंस्पष्टसांगोनिगेले ॥ परीजीवअज्ञानतेसेंचिठेले ॥ देहबुध्दिचानिश्चयोत्याढळेना ॥ जुनेंठेवणेंमीपणेंतेंकळेना ॥ ३७ ॥

भ्रमेंनाडिलेंवित्ततेंगुप्तझालें ॥ जिवाजन्मदारिद्रटाकूनिआलें ॥ देहबुध्दिचेंकर्मखोटेंढळेना ॥ जुनेंठेवणेंमीपणेंतेंकळेना ॥ ६८ ॥

पुढेंपाहतांसर्वहीकोंदलेंसे ॥ अभाग्यानराद्दढपाषाणभासे ॥ अभावेंकदापुण्यकांहींफळेना ॥ जुनेंठेवणेंमीपणेंतेंकळेना ॥ ३९ ॥

जयाचेंतयाचूकलेंप्राप्तनाहीं ॥ गुणेंगोविलेंजाहलेंदुःखदेहीं ॥ गुणेवेगळीवृत्तितेहीवळेना ॥ जुनेंठेवणेंमीपणेंतेंकळेना ॥ १४० ॥

ह्मणेदाससायासत्याचेकरावे ॥ जगींजाणतापायत्याचेधरावे ॥ गुरूअंजनेवीणतेंआकळेना ॥ जुनेंठेवणेंमीपणेंतेंकळेना ॥ ४१ ॥

कळेनाचळेनावळेनाढळेना ॥ टळेनाढळेसंशयोहीढळेना ॥ गळेनागळेनाअंहतागळेना ॥ बळेंआकळेनामिळेनामिळेना ॥ ४२ ॥

अविद्यागुणेंमानवाऊमजेना ॥ भ्रमेंचूकलेंहीततेंपाविजेना ॥ परिक्षेविनाबांधिलेंदृढनाणें ॥ परीसत्यमिथ्याअसेंकोणजाणें ॥ ४३ ॥

जगींपाहतांसाचतेंकायआहे ॥ अतीआदरेंसवेंशोधोनिपाहें ॥ पुढेंपाहतांपाहतांदेवजोडे ॥ भ्रमेंभ्रांतिअज्ञानहेंसर्वमोडे ॥ ४४ ॥

सदावीषयाचिंतितांजीवगेला ॥ अहंभावअज्ञानजन्मासिआला ॥ विवेकेंसदास्वस्वरूपींभजावें॥ जिवाऊगमीजन्मनाहींस्वभावें ॥ १४५ ॥

दिसेलोचनींतेंनसेकल्पकोडी ॥ अकस्मातआकारलेंकाळमोडी ॥ पुढेंसर्वजाईलकांहींनराहे ॥ मनासंतआनंतशोधोनिपाहें ॥ ४७ ॥

तुटेनाफुटेनाचळेनावळेना ॥ सदासंचलेंमीपणेंआकळेना ॥ तयाएकरूपासिदूजेंनसाहे ॥ मनासज्जनासर्वशोधोनिपाहें ॥ ४७ ॥

निराकारआकारब्रह्मादिकांचा ॥ जयासांगतांशीणलीवेदवाचा ॥ विवेकेंतदाकारहोऊनिराहें ॥ मनासंतआनंतशोधोनिपाहें ॥ ४८ ॥

जगींपाहतांचर्मचक्षूनिलक्षी ॥ जगींपाहतांज्ञानचक्षूनिरीक्षी ॥ जगींपाहतांपाहणेंजातआहे ॥ मनासंतआनंतशोधोनिपाहें ॥ ४९ ॥

नसेपीतनाश्वेतनाश्यामकांहीं ॥ नसेव्यक्तअ
व्यक्तकांहींचकांहीं ॥ ह्मणेदासविश्वासतामुक्ति
लाहे ॥ मनासंतआनंतशोधोनिपाहें ॥ ५० ॥

खरेंशोधितांशोधितांशोधिताहे ॥ मनाबोधितां
बोधितांबोधिताहे ॥ परीसर्वहीसज्जनाचेनियोगें॥
बरानिश्चयोपाविजेसानुरागें ॥ ५१ ॥

मनींनिर्मिलादेवतोवोळखावा ॥ जयापाहतां
मोक्षतत्काळजीवा ॥ तयानिर्गुणालागिगूणीवरावें
॥ जगींसंगसोडोनिसूखीरहावें ॥ ५२ ॥

नव्हेकार्यकर्तानव्हेसृष्टिकर्ता ॥ पराहूनिपर्तान
लिंपेविवर्ता ॥ तयानिर्विकल्पासिकल्पीतजावें ॥
जनींसंगसोडोनिसूखीरहावें ॥ ५३ ॥

बहुतांपरीकूसरीतत्त्वझाडा ॥ परीअंतरींपाहिजे
तोनिवाडा ॥ मनासारसाचारतेंवेगळेंरे ॥ समस्तां
मध्येंएकतेंआगळेंरे ॥ ५४ ॥

नव्हेपिंडज्ञानेंनव्हेतत्त्वज्ञानें ॥ समाधानकांहीं नव्हेतानमानें ॥ नव्हेयोगयागेंनव्हेभोगत्यागें ॥ समाधानतेंसज्जनाचेनियोगें ॥ ५५ ॥

महावाक्यतत्त्वादिकेंपंचकर्णें ॥ खुणेंपाविजे संतसंगेंविवर्णें ॥ द्वितीयेसिसंकेतजोदाविजेतो ॥ तयासांडुनीचंद्रमाभाविजेतो ॥ ५६ ॥

दिसेनाजनींतेंचिशोधोनिपाहें ॥ बरेंपाहतांगूजतेथेंचिआहे ॥ करेंघेउंजातांकदांआढळेना ॥जनीं सर्वकोंदाटलेंतेंकळेना ॥ ५७ ॥

ह्मणेजाणतातोमनींमूर्खआहे ॥ अतर्क्यासितर्कींअसाकोणआहे॥जनींमीपणेंपाहतांपाहवेना ॥ तयापाहतांवेगळेंराहवेना ॥ ५८ ॥

बहूशास्त्रधुंडाळितांवाडआहे ॥ जनींनिश्चयो एकतोहीनसाहे ॥ मतीभांडतीशास्त्रबोधेंविरोधें ॥ गतीखुंटतीज्ञानबोधेंविरुद्धें ॥ ५९ ॥

श्रुतोन्यायमीमांसकातर्कशास्त्रें ॥ स्मृतीवेदवेदांतवाक्येंविचित्रें ॥ स्वयेंशेषमौनावलास्थीरराहे॥ मनासर्वजाणीवसोडोनिपाहें ॥ १६० ॥

जेणेंमक्षिकाभक्षिलीजाणिवेची ॥ तयाभोजनाचीरुचीप्राप्तकैंची ॥ अहंभावज्यामानसींचाविरेना ॥ तयाज्ञानहेंअन्नपोटींजिरेना ॥ ६१ ॥

नकोरेनकोवादहाखेदकारी ॥ नकोरेनकोभेदनानाविकारी ॥ नकोरेमनासीकउंपूढिलासी ॥ अहंभावजोराहिलातूजपासीं ॥ ६२ ॥

अहंतागुणेंसर्वहीदुःखहोतें ॥ मुखेंबोलिलेंज्ञानतेंव्यर्थजातें ॥ सुखेंराहतांसर्वहीसूखआहे ॥ अहंतातुझीतूंचिशोधूनिपाहें ॥ ६३ ॥

अहंतागुणेंनीतिसांडीविवेकी ॥ अनीतीबळें श्लाघ्यतासर्वलोकीं ॥ परीअंतरींसर्वहीसाक्षयेते ॥ प्रमाणांतरींबुद्धिसांडूनिजाते ॥ ६४ ॥

देहबुद्धिचानिश्चयोदृढझाला ॥ देहातीततेंही तसांडीतगेला ॥ देहबुद्धितेआत्मबुद्धीकरावी ॥ सदासंगतीसज्जनांचीधरावी ॥ १६५ ॥

मनेंकल्पिलावीषयोसोडवावा ॥ मनेंदेवतोनिर्गुणीवोळखावा ॥ मनेकल्पितांकल्पनातेसरावी ॥ सदासंगतीसज्जनांचीधरावी ॥ ६६ ॥

देहादीकप्रापंचहाचिंतियेला ॥ परीअंतरींलोभनिश्चीतठेला ॥ हरीचिंतनेंमुक्तिकांतावरावी ॥ सदासंगतीसज्जनांचीधरावी ॥ ६७ ॥

अहंकारविस्तारलायादेहाचा ॥ स्त्रियापुत्रमित्रादिकायामोहाचा ॥ बळेंभ्रांतिहेजन्मचिंताहरावी ॥ सदासंगतीसज्जनांचीधरावी ॥ ६८ ॥

बरानिश्चयोशाश्वताचाकरावा ॥ ह्मणेदाससंदेहतोनीरसावा ॥ घडीनेघडीसार्थकाचीकरावी ॥ सदासंगतीसज्जनांचीधरावी ॥ १६९ ॥

करीवृत्तिजोसंततोसंतजाणा ॥ दुराशागुणेंजो नव्हेदैन्यवाणा ॥ उपाधीदेहबुद्धितेवाढवीतो ॥ प रीसज्जनांकेविंबाधूंशकेतो ॥ १७० ॥

नसेअंतआनंतसंतांपुसावा ॥ अहंकारविस्तार लानीरसावा ॥ गुणेवीणनिर्गुणतोआठवावा ॥ देह बुद्धिचाआठवोनाठवावा ॥ ७१ ॥

देहबुद्धितेस्वामिबोधेंत्यजावी ॥ विवेकेंतयाव स्तुचीभेटघ्यावी ॥ तदाकारहेवृत्तिनाहींस्वभावें ॥ ह्मणोनीतयातेंचिशोधीतजावें ॥ ७२ ॥

असेसारसाचारतेंचोरिलेंसे ॥ इहींलोचनींपाह तांहृश्यभासे ॥ निराभासनिर्गुणतेंआकळेना ॥ अ हंतागुणेंकल्पितांहीकळेना ॥ ७३ ॥

स्फुरेवीषयींकल्पनातेअविद्या ॥ स्फुरेब्रह्मरेजा णमायासुविद्या ॥ मुळींकल्पनादोंरुपीतेचिझाली ॥ विवकेंतरीस्वस्वरूपींनिमाली ॥ ७४ ॥

स्वरूपींउदेलाअहंकारह्याहो ॥ तेणेंसर्वआच्छा
दिलेंव्योमपाहो ॥ दिशापाहतांतेनिशीवाढताहे ॥
विवेकेंविचारेंविवंचूनिपाहें ॥ ७५ ॥

जयाचक्षुनेंलक्षितांलक्षवेना ॥ भवाभक्षितांर
क्षितांरक्षवेना ॥ भयाभीततोअक्षयीमोक्षदेतो ॥ द
यादक्षितोसाक्षिनेंपक्षघेतो ॥ ७६ ॥

विधीनिर्मितोलीहितोसर्वभाळीं ॥ परीलीहितोको
णत्याचेकपाळीं ॥ हरूजाळितोलोकसंहारकाळीं ॥
परीशेवटींशंकराकोणजाळी ॥ ७७ ॥

जगींद्वादशादित्यतेरुद्रअकरा ॥ असंख्यातसं
ख्याकरीकोणशक्रा ॥ जनींदेवधुंडाळितांआढळेना
॥ जगींमुख्यतोकोणकैसाकळेना ॥ ७८ ॥

फुटेनातुटेनाकदादेवराणा ॥ चळेनाढळेनाकदादै
न्यवाणा ॥ कळेनाकळेनाकदालोचनासी ॥ असे
नादिसेनाजनामीपणासी ॥ १७९ ॥

जयामानलादेवतोपूजिताहे ॥ परीदेवशोधूनि कोणीनपाहे ॥ जगींपाहतांदेवकोट्यानकोटी ॥ जयामानलीभक्तिजेतेंचिमोठी ॥ १८० ॥

तिन्हीलोकजेथूनिनिर्माणझाले ॥ तयादेवरायासिकोणीनबोले ॥ जगींथोरलादेवतोचोरिलासे ॥ गुरूवीणतोसर्वथाहीनदीसे ॥ ८१ ॥

गुरूपाहतांलक्षकोट्यानकोटी ॥ बहूसालमंत्रावलीशक्तिमोठी ॥ मनाकल्पनाचेटकेंघातपाता ॥ जनींव्यर्थरेतोनव्हेमुक्तिदाता ॥ ८२ ॥

नव्हेचेटकूचाळकूद्रव्यभोंदू ॥ नव्हेनिंदकूमत्सरूभक्तिमंदू ॥ नव्हेउन्मतूव्यसनींसंगबाधू ॥ जगींज्ञानियातोचिसाधूअगाधू ॥ ८३ ॥

नव्हेवाउगीचावटीकामपोटीं ॥ क्रियेवीणवाचाळतातेचिमोठी ॥ मुखेंबोलिल्यासारिखेंचालताहे ॥ मनासद्गुरूतोचिशोधूनिपाहें ॥ ८४ ॥

जगींभक्तज्ञानीविवेकीविरागी ।। कृपाळूमनस्वी क्षमावंतयोगी ।। प्रभूदक्षव्युत्पन्नचातुर्यजाणें ।। तया चेनियोगेंसमाधानबाणें ।। १८५ ।।

नव्हेतेंचिझालेंनसेतेंचिआलें ।। कळोंलागलेंस ज्जनांचेनिबोलें ।। अनिर्वाच्यतेंवाच्यवाचेवदावें ।। मनासंतआनंतशोधीतजावें ।। १८६ ।।

लपावेंअतीआदरेंरामरूपीं ।। भयाभीतनिर्भि तयेस्वस्वरूपीं ।। कदातोजनींपाहतांहीदिसेना ।। तदाऐक्यतेंभिन्नभावेंवसेना ।। १८७ ।।

सदासर्वदारामसन्नीधआहे ।। मनासज्जनासत्यशो धोनिपाहें ।। अखंडीतभेटीरघूराजयोगू ।। मनासां डिंरेमीपणाचावियोगू ।। १८८ ।।

भुतेंपिंडब्रह्मांडहेंऐक्यआहे ।। परीसर्वथास्वस्वरू पींनसाहे ।। मनाभासलेंसर्वकांहींपहावें ।। परीसं गसोडोनिसूखीरहावें ।। १८९ ।।

देहभानहेंज्ञानशस्त्रेंखुटावें ॥ विदेहीपणेंभक्तिपं
थेंचिजावें ॥ विवेकाबळेंनिंद्यसर्वींत्यजावें ॥ अती
आदरेंसज्जनातेंभजावें ॥ १९० ॥

देहबुद्धिचानिश्चयोज्याढळेना ॥ तयाज्ञानक
ल्पांतकाळींकळेना ॥ परब्रह्मतेंमीपणेंआकळेना ॥
मनींशून्यअज्ञानहेंमावळेना ॥ ९१ ॥

मनानाकळेनाढळेरूपज्याचें ॥ दुजेवीणतेंज्ञान
सर्वोत्तमाचें ॥ तयावीणतेंहीणदृष्टांतपाहें ॥ तेथेंसं
गनिःसंगदोन्हीनसाहे ॥ १९२ ॥

नव्हेजाणतानेणतादेवराणा ॥ नयेवर्णितांवेद
शास्त्रंपुराणा ॥ नव्हेदृश्यअदृश्यसाक्षीजयाचा ॥
श्रुतीनेणतीनेणतीअंतज्याचा ॥ १९३ ॥

जयामुक्तिचीवासनापूर्णआहे ॥ तयाचीगुरूचे
पदींवृत्तिराहे ॥ लयेंलक्षितांतेस्वरूपींसरावें ॥ स्वयं
ज्योतिपूर्णप्रकाशेस्वभावें ॥ १९४ ॥

वसेमानसींदेवतोकोणकैसा ॥ पुसेसाधकूआद
र्शप्रश्नजैसा ॥ देहटाकितांदेवकोठेंरहातो ॥ अहंमा
गुतीठावकोठेंपहातो ॥ १९५ ॥

वसेहृदयींदेवतोजाणऐसा ॥ नभाचेपरीसाधकू
सर्वतैसा ॥ सदासंचलायेतनाजातकांहीं ॥ तया
वीणकोठेंरिताठावनाहीं ॥ १९६ ॥

नभासारिखेंरूपयाराघवाचें ॥ मनींचिंतितांमू
ळतूटेभवाचें ॥ तयापाहतांदेहबुद्धीउरेना ॥ सदास
र्वदाआर्तपोटींपुरेना ॥ १९७ ॥

भयेंव्यापिलेंसर्वसृष्टीसआहे ॥ रघूनायकाऊप
मातेनसाहे ॥ दुजेवीणजोतोचितोहास्वभावें ॥ त
याव्यापकूव्यर्थकैसें ह्मणावें ॥ १९८ ॥

नभींवावरेजोअणूरेणुकांहीं ॥ रिताठावयाराघवा
वीणनाहीं ॥ तयापाहतांपाहतांतेंचिझालें ॥ तेथेंल
क्ष्यआलस्यसर्वबुडालें ॥ १९९ ॥

अतीजीर्णविस्तीर्णतेंरूपआहे ॥ तेथेंतर्कसंपर्क
तोहीनसाहे ॥ अतीगूढतेंदृढतात्काळसोपें ॥ दुजे
वीणतेंखूणस्वामीप्रतापें ॥ २०० ॥

मनींहूनियांटाकिलासर्वहेवा ॥ सदासर्वदाआ
दरीनीचसेवा ॥ गुरूचेगृहींझाडितोसारवीतो ॥ मला
तोगमेभूतळींचारवीतो ॥ २०१ ॥

भवापासुनीसद्गुरूतारिंबापा ॥ सदासौख्यदेंछेदु
नीपुण्यपापा ॥ धरीकांसमीदासतूझादयाळा ॥
दिनारक्षितूंदीनबंधूकृपाळा ॥ २ ॥

पदात्वंपदातत्पदाकांहिंनेणें ॥ तुवांबोधिलें
ध्यानतेंएकजाणें ॥ खटाटोपआटोपटाकूनिराहें ॥
त्रिकाळींसदापायतूझेचिपाहें ॥ ३ ॥

नजायेजपासींनजायेतपासीं ॥ नजायेचिका
शीनजायेगयेशीं ॥ गुरूचिंतनेंवीणकोठेंनजाये ॥
त्रिकाळींसदापायतूझेचिपाहें ॥ ४ ॥

कळेआकळेरूपतेंज्ञानहोतां ॥ तेथेंआटलीसर्व साक्षीअवस्था ॥ मनाउन्मनीशब्दकुंठीतराहे ॥ तो घेतोचितोरामसर्वत्रपाहे ॥ २०५ ॥

कदाओळखीमाजिदूजेंअसेना ॥ मनींमानसीं द्वैतकांहींदिसेना ॥ बहूतांदिसींआपुलीभेटझाली ॥ विदेहीपणेंसर्वकायानिवाली ॥ ६ ॥

मनागूजरेतूजलाप्राप्तझालें ॥ परीपाहिजेअंतरीं यत्नकेले ॥ सदाश्रवणेंपाविजेनिश्चयासी ॥ धरीं संगतीसज्जनींधन्यहोसी ॥ ७ ॥

मनासंगहासर्वसोडोनिद्यावा ॥ अतीआदरेंसज्ज नांचाधरावा ॥ जयाचेनिसंगेंमहादुःखभंगे ॥ ज नींसाधनेंवीणसन्मार्गलागे ॥ ८ ॥

मनासंगहासर्वसंगासिसोडी ॥ मनासंगहामो क्षतात्काळजोडी ॥ मनासंगहासाधकाशीघ्रजोडी ॥ मनासंगहाद्वैतनिःशेषमोडी ॥ ९ ॥

मनाचींशतेंऐकतांदोषजाती ॥ मतीमंदतेसाध नायोग्यहोती ॥ चदेज्ञानवैराग्यसामर्थ्यअंगीं ॥ ह्मणेदासविश्वासतामुक्तिभोगी ॥ २१० ॥

॥ इतिश्रीरामदासकृतमनाचेश्लोक ॥

॥ समाप्त ॥

अनंतहस्तेंकमलावरानें ॥ देतांकितीघेशिलदोंकरानें ॥ नेईलजेव्हांतितुक्याकरानें ॥ तेव्हांकिती रक्षिसिदोंकरानें ॥ १ ॥

इच्छाकरावीपरमेश्वराची ॥ निराशाधरावीइतरांजनांची ॥ नाहींचदिल्हेंपरमेश्वरानें ॥ तेंकायद्यावें इतराजनानें ॥ २ ॥

लक्ष्मीकांतअनंतहस्तकमळेंदेतांनभागेकदा ॥ मागेंस्वल्पतयासकल्पतरुदेसंतुष्टव्हावेंसदा ॥ निष्कामीभजतांसमर्पणकरीमोक्षादिकीसंपदा ॥ ऐसास्वामिअसोनिक्षुल्लकपदाकांइच्छिसीदुर्मदा ॥ ३ ॥

भोगेरोगभयंसुखेक्षयभयंवित्तेषुराज्ञोभयं ॥ विद्या
वादभयंतपेंद्रियभयंरूपाद्भयंयोषिताम् ॥ हर्षेशोक
भयं रणेरिपुभयंकायेकृतांताद्भयं ॥ इत्थंजन्मानिरर्थ
कंक्षितितलेविष्णोः पदंनिर्भयम् ॥ ४ ॥

ह्मणेविश्वामित्रस्वमनिंसकळांचेभरवसे ॥ कळों
आलेंआतांमजजवळिविश्वंभरवसे ॥ तयायाश्रीरा
माविणजनकजाअन्यनवरी ॥ ह्मणोनीबोलेकींउठिं
रघुपतीसाधिंनवरी ॥ ५ ॥

पितामाताबंधूतुजविणअसेकोणमजला ॥ बहूमी
अन्यायीपरिसकळहीलाजतुजला ॥ नजाणेमीकां
हींजपतपपुजासाधनरिती ॥ कृपादृष्टींपाहेंशरणतुज
आलोंरघुपती ॥

समाप्त.

हें पुस्तक मुंबईंत बाळकृष्ण लक्ष्मण पाठक यांणीं
जगदीश्वर छापखान्यांत छापविलें. शके १८१६.

# अथ रामस्तुति प्रारंभः

श्रीगणेशायनमः ॥ ॥ संसारसंगेंबहुशीणलोंमी
कृपाकरीं रेरघुराजस्वामी ॥ प्रारब्धमाझेंसहसाटळे
ना ॥ तुजवीणरामामजकंठवेना ॥ १ ॥
मनहेंविकारीस्थिरतानहे रे ॥ त्याचेनिसंगेंभ्रमतेंभ
लेंरे ॥ अपूर्वकार्यींमनहेंविटेना ॥ तुज० ॥ २ ॥
मायाप्रपंचींबहूगुंतलों रे ॥ विशाळव्याधीमध्येंबांध
लोंरे ॥ देहाभिमानेंअतिराहवेना ॥ तुज० ॥३ ॥
दारिद्र्यदुःखेंबहुकष्टलोंमी ॥ संसारमायेंतचिगुंतलों
मी ॥ संचीतमाझेंमजलाकळेना ॥ तुज० ॥ ४ ॥
लक्ष्मीविलासींबहुसौख्यवाटे ॥ श्रीरामध्यातांम
निंकष्टमोठे॥प्रपंचवार्तावदतांविटेना ॥ तुज० ॥५॥
अहोरात्रधंदाकरितांपुरेना ॥ प्रारब्धयोगेंमगराहवे
ना ॥ भवदुःखमाझेंकधींहीटळेना ॥ तुज० ॥ ६ ॥
तीर्थासिजातांबहुदुःखवाटे ॥ विषयांतरींराहुनिसौ

...ना। ॥ तुज० ॥८॥
...।चझालों।अदत्तदोषेंचिदुःखीं
...रणीकशिआठवेना ॥ तुज०॥९॥
...तींभजरामसिंधू ॥ चैतन्यस्वामीनिजदी
। अभ्यंतरींप्रेममनींठसेना ॥ तुज० ॥१०॥
देहींअणुमात्रनाहीं ॥ कुळाभिमानेंपडलों
...शांतुनीदूरकधींकळेना ॥ तुज०॥११॥
...ींमिजआळवीलें ॥ प्रपंचपाशांतचिबू
...ीतमाझेंहोतांदिसेना ॥ तुज०॥१२॥
...र्ऊकिती रे॥ उच्चाटमाझेमनिंवाटती रे॥
...पालटेना ॥ तुज० ॥ १३ ॥
...प्रभुतूंचदाता ॥ मीमूढकींजाणअसें
...ामनींआठववीसरेना ॥तुज०॥१४॥
...तिरामस्तुतिःसमाप्ता ॥

# अथ रामस्तुति प्रारंभः

श्रीगणेशायनमः ॥ ॥ संसारसंगेंबहुशीणलोंमी कृपाकरींरेरघुराजस्वामी ॥ प्रारब्धमाझेंसहसाटळे ना ॥ तुजवीणरामामजकंठवेना ॥ १ ॥

मनहेंविकारीस्थिरतानहे रे ॥ त्याचेनिसंगेंभ्रमतेंभ लेंरे ॥ अपूर्वकार्यींमनहेंविटेना ॥ तुज० ॥ २ ॥

मायाप्रपंचींबहूगुंतलों रे ॥ विशाळव्याधीमध्येंबांध लोंरे ॥ देहाभिमानेंअतिराहवेना ॥ तुज० ॥ ३ ॥

दारिद्र्यदुःखेंबहुकष्टलोंमी ॥ संसारमायेंतचिगुंतलों मी ॥ संचीतमाझेंमजलाकळेना ॥ तुज० ॥ ४ ॥

लक्ष्मीविलासींबहुसौख्यवाटे ॥ श्रीरामध्यातांम निंकष्टमोठे॥प्रपंचवार्तावदतांविटेना ॥ तुज० ॥५॥

अहोरात्रधंदाकरितांपुरेना ॥ प्रारब्धयोगेंमगराहवे ना ॥ भवदुःखमाझेंकधींहीटळेना ॥ तुज० ॥ ६ ॥

तीर्थासिजातांबहुदुःखवाटे ॥ विषयांतरींराहुनिसौ

# अथ रामस्तुति प्रारंभः

॥ संसारसंगेंबहुशीणलोंमी
जाहिर… …धमाझेंसहसाटळे
… ॥ १ ॥
…मतेंभ
… २ ॥
…मध्येंबांध
ज० ॥ ३ ॥
…चियुंतलों
…० ॥ ४ ॥
…मध्यातांम
…ज० ॥ ५ ॥
…गेंमगराहवे
…ज० ॥ ६ ॥
…ांराहुनिसौ


अनेक प्रकारचीं पुराणादिक … धर्मसंबंधीं विषयांचीं पुस्तकें; व्याकरणें, का… नाटकें आणि शालोपयोगी संस्कृत, मराठी, … गुजराथी पुस्तकें स्वल्प किमतीनें … कत मिळतील.

बाळकृष्ण लक्ष्मण …
बुक…
मुंबई, मार्केट, विठ्ठलवाडीचा…